निवडणूक खर्च निरीक्षक यांच्या
कामकाजाबाबत

**राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र**
क्र.- रानिआ/मनपा-२०१८/प्र.क्र.५३/का.५,
नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- २३ एप्रिल,२०१९

## परिपत्रक

सन २०१७ मध्ये राज्यातील महानगरपालिकांच्या मोठया प्रमाणावर सार्वत्रिक निवडणुका पार पडल्या. महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या वेळी उमेदवारांनी केलेल्या खर्चावर लक्ष ठेवण्याकरीता निवडणूक खर्च निरीक्षक म्हणून आयकर अधिकारी तसेच त्यांना सहाय्य करण्याकरीता विक्रीकर विभागातील विक्रीकर अधिकारी यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या होत्या. उमेदवारांनी केलेल्या खर्चावर आळा बसण्यासाठी तसेच अधिक पारदर्शकता येणे गरजेचे आहे. त्यादृष्टीने माहे डिसेंबर, २०१८ मध्ये झालेल्या अहमदनगर महानगरपालिकेच्या वेळी नियुक्त करण्यात आलेल्या निवडणूक खर्च निरीक्षकांशी झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने खालील बाबींचा अवलंब करण्यात यावा..

१. महानगरपालिकांनी निवडणुकीच्या वेळी शॅडो रजिस्टर तयार करणे.
२. निवडणूक खर्च निरिक्षकांना सहायक खर्च निरिक्षक व लेखाविषयक ज्ञान असलेले कर्मचारी उपलब्ध करुन देणे.
३. प्रचारादरम्यान ज्या जाहीर सभा आयोजित केल्या जातात त्याची कार्यक्रम रुपरेषा निवडणूक खर्च निरीक्षकांना आगाऊ उपलब्ध करुन देणे.
४. अंतिम उमेदवारांची यादी प्रसिध्द झाल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी यांनी उमेदवार, निवडणूक प्रतिनिधी यांची एकत्रित बैठक घेणे आवश्यक आहे. सदर बैठकीस सर्वसाधारण निरीक्षक तसेच निवडणूक खर्च निरीक्षक यांना देखील चर्चा करण्यासाठी आमंत्रित करणे.

५. उमेदवारांचे निवडणूक प्रतिनिधींना खर्चाबाबतचे सर्व लेखे व्यवस्थित नोंदी घेऊन अद्ययावत ठेवण्याबाबत सूचना देणे.

सर्व महानगरपालिका आयुक्तांना निर्देशित करण्यात येते की, उपरोक्त मुद्दे लक्षात घेऊन त्यानुसार कार्यवाही करावी तसेच निवडणुकीच्या वेळी नियुक्त करण्यात आलेल्या निवडणूक खर्च निरीक्षकांना आवश्यक कागदपत्रे, साधनसामग्री व सोयी सुविधा पुरविण्यात याव्यात, जेणेकरुन निवडणूक खर्च निरीक्षकांना त्यांचे कामकाज प्रभावीपणे पार पाडता येणे शक्य होईल.

मा.राज्य निवडणूक आयुक्त,महाराष्ट्र यांच्या आदेशानुसार,

(राजाराम झेंडे)
सह सचिव,
राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

प्रति,

सर्व महानगरपालिका आयुक्त
निवड नस्ती